औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गुरुवार दि. २९. १२. ८८ रोजी झालेल्या ३३ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. ईश्वर भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| श्री. अ. म. महाजन | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| श्री. द. मो. गोडघाटे, उपसंचालक, नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग | सभासद |

विभागीय आयुक्त, औरंगाबाद व आयुक्त महानगरपालिका हे पूर्व सूचना देऊन केंद्रीय सचिवाच्या कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

विषय क्र. १:- मंडळाच्या दिनांक २४. ११. ८८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १३४

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २४. ११. ८८ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास मान्यता देण्यात आली.

या विषयावर चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे यांनी दिनांक २४. ११. ८८ चा विषय क्र २ व ठराव क्र. १२६ यात वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अंतर्गत सर्वेक्षणाचे काम जे डिसेंबर १९८८ अखेर पूर्ण होण्याची अपेक्षा होती त्याच्या प्रगतीबाबत विचारणा केली असता सदर काम प्रगतीपथावर असून दिनांक १५. १. ८९ पर्यन्त पूर्ण होईल अशी अपेक्षा असल्याचे उपसभापती यांनी सांगितले.

विषय क्र. २:- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे उस्मानपुरा भागातील जयसहयाद्री को.ऑप हौसींग सोसायटीस देण्यांत आलेल्या मध्यम उत्पन्न गटान्तर्गत १२ गाळयांची किंमत निश्चित करणे.

ठराव क्र. १३५

वरील विषयाबाबत चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, जयसहयाद्री सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विनंतीनुसार न्यायालयाच्या बाहेर सदर संस्थेशी बोलणी करावयास हरकत नाही. परंतु बोलणीद्वारे तडजोडीचा निर्णय झाल्यास संस्थेने तो अंमलात आणण्यापुर्वी न्यायालयातून प्रकरण मागे घेतले पाहिजे. तसेच मंडळास न्यायालयीन प्रकरणासाठी आलेला खर्च भरपाई म्हणून दिला पाहिजे. तसेच ताळेबंदाप्रमाणे या योजनेवरील एकुण भांडवली खर्च रु.३,३६,३८८ मधून संस्थेने भरलेली रक्कम वजाजाता येणारी रक्कम आणि त्यावरील व्याज अशी एकुण रक्कम संस्थेकडून वसुल करावयाचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजुरीस्तव पाठविण्यांत यावा आणि त्यानंतरच पुढील कारवाई करावी असा निर्णय मंडळाच्या सभेत घेण्यांत आला.

विषय क्र. ३:- एकनाथनगर औरंगाबाद येथील वसाहतीमध्ये समाजमंदीरासाठी राखून ठेवलेल्या जागेची किंमत निश्चित करुन गाळेधारकांच्या एकनाथनगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था [म] एकनाथनगर,औरंगाबाद या संस्थेस जागेचे वाटप करणे.

ठराव क्र. १३६

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन संबंधीत कागदपत्रे मंडळाच्या सभासदांना दर्शविण्यांत आले. त्यानंतर ३००० चौ.फुट [५०×६० फुट] या जमिनीची सुधारीत किंमत रु. १५,१८८/- ला मान्यता देण्यांत आली. तसेच गाळेधारकांच्या समाजमंदीरासाठी राखून ठेवलेली ही जमिन समाजमंदीरा करिता " एकनाथनगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था [म] एकनाथनगर औरंगाबाद" या संस्थेस सुधारीत किंमतीस वाटप करण्यास मंजूरी देण्यांत आली.

विषय क्र. ४:- धुळे येथील ३८० अल्प उत्पन्न गट योजनेतील सर्वे नं. ४७८ वर बांधलेल्या गाळ्यापैकी काही गाळ्याचे दि. २७. ४. ८८ रोजी आलेल्या चक्रीवादळामुळे झालेले नुकसान व तदनंतरची दुरुस्ती.

ठराव क्र. १३७

प्रारंभी उपसभापतींनी धुळे येथे २७. ४. ८८ रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे जे नुकसान झाले याबाबत माहिती दिली व वादळामुळे नुकसान झालेल्या घरांच्या दुरुस्तीकरिता रु. २१,८००/- इतका खर्च येईल असे सांगितले.

याबाबत विचार होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सदर दुरुस्तीसाठी रु. २१,८००/- पर्यन्त खर्च करण्यांत यावा. तसेच वादळामुळे झालेल्या हानीची नुकसान भरपाई मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यांत यावा व त्यांच्या मार्फत काही निधी उपलब्ध होत असल्यास प्रयत्न करावा म्हणजे लाभधारकावरील बोजा कमी होऊ शकेल.

विषय क्र. ५:- मंडळाचे ८८-८९ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि ८९-९० चे अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करणे.

ठराव क्र. १३८

प्रारंभी उपसभापतींनी १९८८-८९ च्या सुधारीत अंदाजपत्रकासंबंधी व ८९-९० च्या मुळ अंदाजपत्रकासंबंधी माहिती दिली. श्री. द. मो. गोडघाटे यांनी अंदाजपत्रकात दर्शविण्यांत आलेल्या विविध लेखा शिर्षासंबंधी माहिती विचारली असता उपसभापतींनी तसेच मुख्य लेखा अधिकारी यांनी संबंधीत लेखाशिर्षा खाली कोणता खर्च नोंदविण्यांत येतो याबाबत माहिती दिली. तसेच प्राधिकरणाने अंदाजपत्रकासंबंधी निश्चित केलेल्या वेळापत्रकाची माहिती देण्यांत आली.

श्री. द. मो. गोडघाटे यांनी मंडळाच्या भूसंपादन विषयक कायदेशीर बाबी हाताळण्यासाठी "कायदा विषयक सल्लागार मंडळ" [LEGAL ADVICE CELL. ] स्थापन करावे अशी सूचना केली. तसेच मंडळाच्या कार्यालयासाठी चांगली इमारत बांधण्यात यावी अशी सूचना केली. मा. सभापती यांनी प्राधिकरणाने वरील प्रस्तावास तत्वत: मंजूरी दिली असल्याचे सांगितले. उपसभापती यांनी कार्यालयासाठी इमारत बांधण्याबाबत प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविला असल्याचे सांगितले.

चर्चेअंती अर्थसंकल्पास मंजूरी देण्यांत आली.

विषय क्र. ६:- औरंगाबाद, नासिक महानगरपालिका/जालना व मालेगांव नगर परिषद यांच्याकडून आलेल्या गलिच्छवस्ती सुधारणा योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव क्र. १३९

१] औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे "प्रियदर्शनीनगर" या गलिच्छ वस्तीच्या सुधारणा कार्यक्रमाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त झाला आहे. सदर गलिच्छवस्ती शासनाच्या जमिनीवर वसलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी यांचेकडून " ना हरकत प्रमाणपत्र" मिळविण्याच्या अटीवर व यावर्षीच्या उपलब्ध तरतुदीतून अन्यथा पुढील [८९-९०] आर्थिक वर्षातील तरतुदीतून परीपूर्ती करण्यांत येईल या दोन अटीवर रु. १२,४२,५१० इतक्या खर्चाच्या गलिच्छवस्ती सुधार कामास प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

२] जालना:- जालना येथील खांडसरी ही गलिच्छवस्ती सुधारणे प्रस्तावावर विचार होऊन रु. ३.४० लाख खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

तसेच कन्हैयालाल नगर या गलिच्छवस्ती सुधारणा कामाच्या रु. ७.९० लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास ८९-९० साली नगरपरिषदेस काम सुरु करता यावे यादृष्टीने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रस्तावीत कामाचा खर्च सुरवातीस नगरपरिषदेने स्वत: करावयाचा आहे व खांडसरी गलिच्छवस्तीची कामे पूर्ण झाल्यावर जर ८९-९० मधील तरतुद शिल्लक राहिल्यास या कामावरील खर्चाची प्रतिपूर्ती करण्यांत यावी या अटीवर ही प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

३] मालेगांव : दत्तनगर व मुस्लीमनगर येथील अनुक्रमे रु. ३.३७ व रु. ०.१८ लक्षचा प्रस्ताव आहे. या गलिच्छवस्तीच्या कामांना सदर नगरपरिषदेस ८८-८९ सालची तरतुद खर्च करता यावी म्हणून व नविन कामे हाती घेण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यता देण्यांत आली. सदर मान्यता ८८-८९ च्या उपलब्ध तरतुदीनुसार व ८९-९० च्या तरतुदीतून प्रतिपुर्ती करण्याच्या अटीवर देण्यांत येत आहे.

४] नासिक

नासिक येथील (१) सहजीवननगर, २] गुलाबवाडी, ३] फकीरवाडी या गलिच्छवस्त्यास अनुक्रमे रु. ०.७४ लक्ष, रु. २.७९ लक्ष, रु. २.८४ लक्ष याप्रमाणे ८८-८९ सालच्या तरतुदीतून प्रतिपूर्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. ८८-८९ सालच्या तरतुदीतून प्रतिपूर्ती होऊ न शकल्यास पुढील

-५-

वर्षाच्या ८९-९० सालच्या तरतुदीतून प्रतिपुर्ती करण्यांत यावी या अटीवर मान्यता देण्यांत आली.

१] वडारवाडी भाग-२ [भराडवाडी], २] टक्करमाळ भाग-२ [. फुलेनगर], ३] रोकडोबावाडी या गलिच्छवस्तीतील योजनांना अनुक्रमे रू. २.९७ लक्ष, रू. १.६७ लक्ष, रू. ३.५० लक्ष च्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सदर प्रशासकीय मान्यता या अटीवर आहे की, नाशिक महानगरपालिकेने प्रथम स्वतःच्या निधीतून खर्च करावा व त्याची प्रतिपूर्ती ८९-९० सालच्या किंवा त्यानंतरच्या . सालच्या उपलब्ध तरतुदीतून करण्यांत येईल.

एकलहरा व उत्कर्षनगर या गलिच्छवस्तीच्या सुधारणा योजनांच्या अनुक्रमे रू.७.२९ व ०.५१ लक्ष च्या अंदाजपत्रकास ८९-९० किंवा त्यानंतरच्या उपलब्ध तरतुदीतून प्रतिपूर्ती करण्याच्या व प्रतिपूर्ती पुर्वी राजपत्राची प्रत उपलब्ध करून देण्याच्या अशा अदोन अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

यानंतर मा. सभापतींचे परवानगीने उपसभापती यांनी नविन गृहनिर्माण योजनांचे तातडीने नियोजन करण्यामध्ये असलेल्या अडचणी सांगितल्या. मंडळामधील सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे अडचणीत भरच पडली असल्याने मंडळाच्या पटलावरील नोंदणीकृत खाजगी वास्तुशास्त्रज्ञांना नविन कामे यावीत असे ठरले.